प्रकरण तिसरे

# 'यमुनापर्यटन' कादंबरीची प्रेरणा व स्वरूप

प्रकरण - तिसरे

# 'यमुनापर्यटन' कादंबरीची प्रेरणा व स्वरुप

सामाजिक कादंबऱ्यात चर्चिलेले विभिन्न विषय, कादंबरीकारांनी आपल्या कथानकांसाठी योजलेली पार्श्वभूमी व कादंबरीच्या कार्यक्षेत्राविषयी लेखकांच्या भिन्न अपेक्षा व कल्पना - या सर्वांचा विचार करता सामाजिक कादंबऱ्यांचे अनेक उपविभाग संभवतात. तथापि मुख्यत: कादंबरीकाराची कादंबरीलेखन प्रसंगीची वृत्ती विचारात घेता सामाजिक कादंबऱ्यांचे तीन प्रकार दिसून येतात. हे तीन प्रकार म्हणजे कल्पनारम्य कादंबऱ्या, वास्तववादी कादंबऱ्या व प्रचारकी कादंबऱ्या. कल्पनारम्य कादंबऱ्यादेखील सत्यसृष्टीच्या आधारावरच रचलेल्या असतात. त्यांतील पात्रे अतिमानव नसून समाजात ज्यांच्या भेटीगाठी कित्येकदा होतात अशा व्यक्तीसारखीच ही माणसे असतात. पण सर्वसाधारणपणे अशा कादंबऱ्यात समाजरचनेचे जे चित्र आपल्याला आढळते किंवा या कादंबऱ्यात जे घटनाप्रसंग वर्णिलेले असतात ते नित्य अनुभवाचे नसतात. उलट वास्तववादी कादंबरीचे ध्येय सभोवतालच्या सृष्टीचेच शक्यतोवर यथार्थ चित्र देऊन तिच्याशी वाचकांचा परिचय करून देण्याचे असते. वास्तववादी कादंबरीत वस्तुस्थिती रेखाटताना प्रसंगी सौंदर्याची हानी करूनही सत्याकडे लक्ष पुरवावे लागते, तर कल्पनारम्य कथानकाला, ''स्थलकालाची बंधने नसल्यामुळे स्वच्छन्द वाहणाऱ्या वायूची अल्हादकारी वृत्ती त्यात आढळते.'' प्रचारकी कादंबरीस एका दृटीने वास्तववादी कादंबरीच्याच सदरात घालण्यास हरकत नाही? फरक एवढाच की, प्रचारकी कादंबऱ्या हेतुपुरस्पर मतप्रचारासाठीच लिहिलेल्या असतात व स्वत:चे विचार प्रदर्शित करुन वाचकांची मतेही आपणास अनुकूल करणे यावरच लेखकाना विशेष कटाक्ष असतो. 'कादंबरीची रचना' या पुस्तकात प्रा.कुलकर्णी यांनी कादंबरीचे अद्‌भुतरम्य आणि वास्तववादी असे दोन वर्ग कल्पिले असून ते म्हणतात, ''वास्तववादी कादंबरीचा प्रांत फार मोठा आहे. वस्तुस्थितीचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या कादंबरीपासून तो अपवादात्मक सत्यावर अधिष्ठित अशा कल्पनारम्य कादंबऱ्यापर्यंत सर्वांचा समावेश वास्तववादी या सदरातच करावा लागेल.''

प्रश्नात्मक कादंबऱ्यांची परिणती पुष्कळदा न कळतच प्रचारकी स्वरुपात होते. प्रचारकी कादंबऱ्या हे बोधवादाचे अखेरचे टोक होय. एकापरीने अगदी प्रारंभीच्या नीतिकथा व अशा प्रचारकी थाटाच्या कादंबऱ्या यांचा निर्मिती हेतू एकच आहे. मराठी कथावाङ्‌मयाचा आरंभ प्रचारकी नव्हे तरी

बोधकथांपासूनच झाला. इतकेच नव्हे तर, त्या वेळेचे प्राय: काव्यसुद्धा सर्व वाङ्मय बोधस्वरुपाचेच आपणांस आढळते. येथे हा इशारा मात्र देणे अवश्य वाटते की, प्रचारकी कादंबऱ्या वस्तुस्थिति निदर्शनात्मकच असतात असे मात्र नाही. पुष्कळदा सत्यसृष्टीत न आढळरारे पण लेखकास योग्य वाटत असलेले ध्येय त्यास कादंबरी माध्यमाद्वारा मांडावयाचे असल्याने त्याने निर्माण केलेली पार्श्वभूमी सत्य सृष्टीचे प्रतिबिंब न राहता कल्पनारम्य अशीच असते.

मराठी सारस्वतात पहिली कादंबरी म्हणून 'यमुना पर्यटन' या कादंबरीचा उल्लेख केला जातो. बाबा पदमनजी यांनी १८५७ साली जेव्हा ही कादंबरी लिहिली तेव्हा त्यांच्या दृष्टीसमोर ख्रिस्ती धर्माचा प्रसार हा हेतू होता[१], तसेच हिंदू धर्मातील अनेक त्रुटी दाखवून लोकमत जागृत करण्याचाही उद्देश होता. पर्यायाने धर्मप्रसार हे प्रधान उद्दिष्ट असल्याने बाबा पद्मनजी यांनी तत्कालीन हिंदू स्त्रीकडे बघण्याची दृष्टी लोकनिंदेला घाबरुन जाण्याची वृत्ती, समाजाला सामोरं जाण्याची अक्षमता अशा विविध गोष्टी नजरेसमोर आणून यमुनापर्यटन कादंबरीची रचना केली आहे.

बाबा पदमनजी बेळगावच्या मिशन हायस्कुलात असतानापासून धर्मविषयक प्रश्नांचा विचार करण्यास त्यांनी आपल्या बुद्धीला बरीच चालना दिली. मंत्र, तंत्र, पंचाक्षरी, भूतबाधा इत्यादिकांचा सुळसुळाट झालेल्या हिंदूधर्माबद्दल त्यांच्या मनात संशय उत्पन्न होऊ लागला. त्यानंतर १८४९ च्या सुमारास ते मुंबईस येऊन त्यांचा प्रवेश फ्रि चर्च विद्यालयात झाला. त्यावेळी फि चर्च विद्यालयाची सर्व व्यवस्था रे. डॉ. जॉन विल्सन यांच्या ताब्यात होती. येथे आल्यावर त्यांचे मन धर्मविषयक विचारांकडे अधिकाधिक वळू लागले. त्यामुळे हिंदू धर्मातील खुळचट चालींचा त्यांना तिटकारा येऊ लागला. जसजसे त्यांचे शिक्षण अधिकाधिक होऊ लागले. तसतशी विचार करण्याची शक्तीही वाढू लागली. त्याचवेळी चांगलीशी धर्मविषयक व्याख्यानेही त्यांच्या श्रवणात आली. १८५१ ते ५४ च्या सुमारास त्यांची स्त्रीविद्याभ्यास, निबंध, हिंदू लोकांच्या सणाविषयी निबंध, व्याभिचार निबंधक बोध, कुटुंबसुधारणा ही पुस्तके प्रसिद्ध झाली १८५४ च्या सप्टेंबर महिन्यात त्यांनी ख्रिस्ती धर्म स्विकारला त्यानंतर थोड्याच दिवसाच्या आत त्यांनी 'यमुनापर्यटन' हे पुस्तक लिहिले.

'यमुनापर्यटन' या सामाजिक कादंबरीच्या प्रेरणा खालीलप्रमाणे सांगता येतील.

## १. ख्रिस्ती धर्मप्रसार -

बाबा पद्मनजींनी १८५७ ला 'यमुनापर्यटन' ही कादंबरी लिहिली. त्यावेळी ख्रिस्ती धर्माचा प्रचार व प्रसार करणे हेच मुख्य उद्दिष्ट त्याच्या लेखनामागे होते. हे बाबा पद्मनजींच्या 'यमुनापर्यटन' कादंबरीच्या मनोगतात आहेच. बाबा पदमनजींनी यमुनापर्यटनात विधवा स्त्रियांची दुरावस्था वर्णिली आहे. ती वर्णन करताना त्यांनी वैधव्यातील परिस्थितीचे निरनिराळे पैलू निरनिराळ्या स्त्रियांच्या मध्यस्थितीचे निरनिराळे पैलू निरनिराळ्या स्त्रियांच्या मध्यस्थिने व्यक्त केले आहेत. निराधार विधवा, आश्रयाने राहणाऱ्या विधवा, नातेवाईकांनी फसविलेल्या विधवा इ. प्रकार कल्पून त्यांनी या विषयीचे सर्व पैलू मांडण्याचा प्रयत्न केला आहे.[२] अशा या स्त्रिया हिंदू धर्मातील असल्यामुळे त्यांना वैधव्याचे कलेशकारी जीवन जगावे लागत आहे असे सांगून त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्विकार केला तर त्यांना येशूचे महात्म्य समजेल व मनाला थोडा तरी आनंद मिळेल. असे बाबांना सुचवायचे आहे.

यमुना पर्यटनाची नायिका यमुना ही मिशनऱ्यांच्या शाळेत शिकलेली गरिबाची मुलगी. तिचे लग्न सुस्थितीतील विनायकाशी झाले. ते त्याच्या आईने वचन दिले होते म्हणून हे लग्न झाले. तरी तिला मनोमन सुख वाटत नव्हते. या कुटुंबाच्या शेजारच्या तरुण गृहस्थ शिवराम वारल्यावर त्याच्या पत्नीने केशवपनाच्या भितीने विहरीत जीव दिला. ही हकीकत कळल्याने यमुनेच्या मनात निरनिराळ्या विचार येऊ लागले. नंतर ती नवऱ्याबरोबर प्रवासास निघाली वाटेत तिचा मुक्काम पडला तेथे वेणू नावाची एक तरुण विधवा होती. तिच्यावर कामाचा बोजा होता. आणि खाण्यापिण्याचे हाल होत होते.तिच्या दुस्थितीत यमुनेने तिलायेशूचा उपदेश ऐकविला व तिला थोडाफार विरंगुळा मिळवून दिला. पुढे हे जोडपे नागपुरास आले. विनायकाचा मराठी मित्र, दौलतराव याची मामेबहिण विधवा होती. ब्राह्मणाप्रमाणे उच्च मराठ्यानींही पुर्नविवाह त्याज्य ठरविल्याने तिला मोकळीक नव्हती. तिच्या विनोदनासाठी तिच्या बापाने एक पुराणिक ठेवला आणि गोपी आख्यान लावले. त्यामुळे नंतर ती विधवा मुलगी हजार-दीडहजाराचा ऐवज घेवून त्या पुराणिकाबरोबर पळून गेली. नागपूरहून यमुना व विनायकराव ही पंढरपुरास आली. तेथली घरमालकीण विकेशा विधवा होती पण अपरात्री डोक्यावर केसाचा टोप घालून व सर्व सौभाग्यचिन्हे धारण करुन ही बाई व्यभिचारासाठी घराबाहेर जावून पहाटे परत येई. कुणी विचारले तर सांगे, ''माझ्या घरी विठ्ठलाचही रमखाई दिवसा गुप्तपणाने राहते. ती रात्री विठ्ठलाकडे जाते.'' अशी आपल्या देवाचीही नाचक्की करण्यास ती कमी करीत नसे. नंतर तिच्यावर पाळत ठेवून विनायकाने तिला पकडले तेव्हां तिने आपल्या दोन लग्नाची व बदकर्माची



SHIVAJI UNIVERSITY

कहाणी उभयंताना सांगितली. पंढरपूरहून सातान्यास येताना वाटेत एक भिक्षेकरी विधवा भेटली तिच्या निमित्ताने गड्याने कुमार्गाला लागणाऱ्या विधवांच्या गोष्टी यमुनेला सांगितल्या होत्या. त्यातूनच भटीणबाईची ही हकिकत समजली. तिच्या पतीनिधनानंतर तिच्या दिराने घात करून तिला दारोदार अन्न-अन्न करायला लावले होते. सातान्यास जगन्नाथ सोनाराकडे विनायक व यमुना उतरली. तेथे पुत्रजन्मोत्सवानिमित्त पुर्नविवाहाच्या इष्टनिष्ठतेवर वाद झाला. त्यात पुनर्विवाह पक्षाची सरसी झाली.

सातारा सोडून जेजुरीस येताना विनायकास गाडी भडकून इजा झाली व तितच त्याचा अंत झाला. मरतेसमयी यमुनेने त्याला बाप्तिस्मा दिला. यमुनेच्या केशवपनाचा प्रश्न तावडतोब पुढे आला नाही पण पुढे ती भाषा सुरु झाली तेव्हा तिला पवित्र शास्त्राच्या वचनाने धीर आला. गुरुचरित्रादिकांच्या वाचनाने यमुनेला केशवपनास तयार करण्याचे प्रयत्न झाले. पण यमुना वळली नाही. तिचा सासराही तिला अनुकूल होता. गावातून दडपण आणण्याची तयारी झाली तेव्हा यमुना ही पंढरपुरात भेटलेली विधवा व तिचा मुलगा शिवराम यांच्या सहाय्याने विनायकाच्या ख्रिस्ती मित्राकडे गेली. ~~[illegible]~~ही [सासऱ्याने] यमुनेला आर्थिक मदत केली. नंतर यमुनेने एका शीलवान ख्रिस्ती गृहस्थाशी पुनर्विवाह केला व शिवरामही ख्रिस्तसेवक झाला.

अशा प्रकारे बाबा पद्मंजीनी ख्रिस्ती धर्मप्रचारही प्रेरणा मनात ठेवूनच ब्राह्मण आणि मराठी समाजातील विधवा स्त्रियांची स्थिती किती दु:खकारक होती हे दाखविण्यासाठीच नायिकेला महाराष्ट्राच्या अनेक गावांचा प्रवास घडविला आहे. प्राप्त परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी सुखाचा जीवनमार्ग दाखविणारा एकच मार्ग म्हणजे ख्रिश्चन धर्माचा स्विकार हे जणू ध्येय ठेवूनच विनायकाच्या मृत्यूनंतर यमुना 'शरीराच्या रक्षणासाठी आणि आत्म्याच्या कल्याणासाठी' एका ख्रिश्चन माणसासी पुनर्विवाह करते असे चित्रण त्यांनी केले आहे. गोदू, वेणू, शिवरामची आई, भटीणबाई या सर्व स्त्रियांनी जर ख्रिस्ती धर्माचा स्विकार केला असता तर त्यांना इतके वैधव्याचे दु:ख भोगावे लागले नसते असेही त्यांना सुचवायचे आहे. कारण यमुना ही पती निधनानंतर वैधव्याचे दु:ख न भोगता पुनर्विवाह करते आणि सुखी जीवन जगते याचे महत्वाचे कारण म्हणजे तिने स्विकारलेला ख्रिस्ती धर्म हे होय. अर्थात ख्रिस्तीधर्मप्रसार हा बाबा पदमनजीचा प्रधान हेतू या कादंबरीलेखनामागे असला तरीही समकालीन उच्च वर्गीय कुटुंबातील विधवा स्त्रियांचे वास्तव चित्रण त्यांनी केलेले आहे हे जराही नाकारता येत नाही.

## २. विधवा पुनर्विवाह -

हे पुस्तक लिहण्याचा दुसरा हेतू हा आहे की विधवांचा त्यांच्या खुशीप्रमाणे पुनर्विवाह करावा. याविषयी अजून ज्यांची खात्री झाली नाही त्यांनी आपल्या जातीतील विधवांची कशी दशा आहे ती पहावी म्हणजे त्यांनाही विधवांच्या पुनर्विवाहाचा हेतू पटेल. कादंबरीतील केशवपनाच्या भितीने विहरित उडी टाकणारी विधवा गोदावरी, वेणू, शिवरामची आई या सर्व विधवांची दुःखे पाहूनच यमुनेला आपल्या पतीच्या मृत्यूनंतर आपले काय होईल याची भिती वाटते व या भितीपासून मुक्तता मिळविण्यासाठी ख्रिस्ती धर्माचा स्विकार करते. नवऱ्यालाही बाप्तिस्मा देते योगा-योगाने पुढे घडतेही तसेच विनायकाचा मृत्यू होतो व यमुना विधवा होते परंतू इतर विधवांच्याप्रमाणे यमुना अनाचाराकडे वळत नाही किंवा आत्महत्या करत नाही, किंवा मुकाटपणाने वैधण्याचे दुःखही भोगत नाही. कारण यमुना आता हिंदू स्त्री नाही तर ती ख्रिश्चन आहे. ती केशवपनाला विरोध करते. इतकेच नाही तर ख्रिस्ती धर्म स्विकारलेल्या विनायकाच्या एका मित्राशी पुनर्विवाह करते. म्हणून वरील सर्व विधवांनी पुनर्विवाह करण्याचे ठरविले असते तर त्यांचेही जीवन यमुनेप्रमाणे सुखावह झाले असते.

गोदू, वेणू शिवरामची आई, भटीणबाई या सर्व विधवांच्याकडे पाहण्याचा बाबा पमनजींचा दृष्टीकोन एका नमुनेदार समाजसुधारकाचा दृष्टीकोन आहे[३]. अपमानित, कष्टमय आणि विद्रूप जिणे जगण्याचा प्रसंग ज्या दुर्दैवी स्त्रियांच्यावर आला त्यांच्या जीवनाची यातनामयता सुधारकांना फारशी आक्षेपार्ह वाटली नाही. या विधवा अनैतिक मार्गाने जातात त्यातून भ्रूणहत्येसारखी पापे घडतात. अनाचार वाढतो. या नैतिक प्रश्नाकडे त्यांचे लक्ष अधिक आहे. उदा.- विनायकरावास पाठवलेल्या एका पत्रातील पंत नावाच्या गृहस्थाच्या विधवा मुलीच्या व्याभीचाराची हकिकत.

पंत नावाचा हा गृहस्थ एका जहागिरदारकडून इंग्लिश सरकारच्या कामकाजास्तव राहत होता त्यास दहा वर्षाचा एक मुलगा व एक कन्या होती. त्याची एकुलती एक कन्या बारा वर्षाची असताना विधवा झाली त्यामुळे त्याला फार दुःख वाटत असे. ब्राह्मण जातीत पुनर्विवाह नसल्यामुळे त्या मुलीस वैधव्यदशेत आपल्या आई-बापाच्याच घरी जन्म काढावा लागत होता. तिच्या आईने तिला पुजा-अर्चा करण्यास सांगितले तरी त्या मुलीचे चित्त स्वस्थ होईना ती तारुण्यदशेत आल्यावर लागलेच तिचे मुंडण केले. अशा स्थितीत ती असता तिचा धाकटा भाऊ मराठी शाळेत जाऊ लागला. त्याचा अभ्यास चांगला व्हावा म्हणून त्याच्या बापाने एक तरुण मुलगा त्यास शिकविण्यास घरी ठेवला नंतर काही दिवसांनी त्याने पगाराअभावी आपले काम सोडले तरी पहिली ओळख असल्यामुळे

त्याने घरी येणे-जाणे ठेवले. पुढे काही काळाने असे झाले की, एके दिवशी कोणी सरकारी कामगार सकाळच्या प्रहरी घोड्यावरून फिरत जात असता त्याने पंतांच्या परसदाराच्या रस्त्याचे बाजूवर कळकीच्या बेटात काही लोंबत आहे व त्यावर कावळे झडप घालीत. आहेत असे पाहिले तेव्हा त्यांस संशय येऊन त्याने ते काढून पाहिले. तो ते एका सुंदर बाळाचा पाच महिन्यांचा गर्भ आहे असे समजले. नंतर कोतवालाने आसपासच्या सर्व विधवा बायकांची चौकशी केली पण कोणावरही हा अपराध लागू होण्याचे चिन्ह दिसत नव्हते. मग पंताच्या घरी कोणी विधवा आहे काय असा शोध केला तेंव्हा समजले की पंताची कन्या विधवा आहे पण ती आजारी आहे. पण कोतवालाने जबरदस्तीने तिला बाहेर बोलावून विचारले तेव्हा तीने कबूल केले की हा गर्भ अर्जून या नावाच्या पुरुषापासून राहिला व पाचवा महिना असता तिने हे कर्म केले. नंतर तिला कैद झाली. कैद भोगल्यानंतर तेथून निघून पुण्यास गेली तेथे तिला एका पारशाने आपणापाशी ठेवून घेतले आहे.

सगळ्याच विधवा पुनर्विवाह न केल्यामुळे बिघडतात असे बाबा म्हणत नाहीत न बिघडलेली व वैधव्याचे दुःख मुकाटपणे भोगणारी वेणू त्यांनी दाखविली आहे. सगळ्यांनाच पुनर्विवाहाची इच्छा असते असेही ते म्हणत नाहीत. तरीसुद्धा त्यांचे प्रमुख लक्ष विधवांच्या अनितीवरच आहे. पुनर्विवाहाच्या मोकळेपणामुळे स्त्रियांना प्रतिष्ठित सुसह्य जीवन मिळेल या कल्पनेपेक्षा अनीतीचे प्रमाण कमी होईल ही कल्पना समकालीन हिंदू सुधारकांना आकर्षक वाटत होती. बाबांच्यामध्येही ही भूमिका आलेली आहे. कोणीही विधवा ख्रिस्ती झाली तर तिला पुनर्विवाह करून आपले जीवन शिष्टसंमत मार्गाने घालविता येते असे स्पष्ट निदान सांगितले आहे[४]. बाबा पदमनजींना पुनर्विवाह करण्यास मराठी ब्राह्मण जातीतही मान्यता आहेहे पटवून देण्यासाठी मनूचे वचन पराशराचे वचन यांचाही आधार घेतला आहे. तसेच शिवरामसारखा मुलगा ज्याने आपल्या प्रिय आईला व परोपकारी ताईला वैधव्यामुळे जी दुःख भोगावी लागली हे पाहिले आहे म्हणूनच त्याने विधवा पुर्नर्विवाहासाठी खूप प्रयत्न केले असेही दाखविले आहे. तसेच पुरवणी अंकात वैदिक काळात विधवेचा पुनर्विवाह करण्याची चाल होती हे पटवून देण्यासाठी ऋचा ऋग्वेदाच्या १० व्या मंडळात सातव्या अष्टकात १९ व्या सूत्राचाही आधार घेतला आहे तो खालीलप्रमाणे -

''उदीर्ष्व नार्यति जीवलोकं गता सुमेत मुप शेष एहि ।

हस्त ग्रामस्य दिधिपोस्तवेदं पत्युर्जनित्व मभि सं बभूत ।।



KO

याचाच अर्थ असा की - पतीचे प्रेत स्मशानात गेल्यानंतर त्याच्याजवळ त्याची विधवा पडून राहिली असता तिला असे म्हणत की, हे बाई ज्याचा जीव गेला आहे. त्याच्याजवळ का पडली आहेस? उठ आणि ज्याने तुझा हात धरिला आहे व जो तुजशी लग्न करायास सिद्ध आहे त्याची बायको हो.

याबरोबरच महाराष्ट्र व गुजराथी पुनर्विवाहाची संख्या, पुनर्विवाहासंबंधी कायदा, हिंदू विधवांची झालेलीलग्ने इ. प्रकारची माहितीही या पुस्तकाच्या पुरवणी अंकांत दिली आहे.

**हिंदू धर्मातील अनिष्ट रुढी आणि वैधव्य -**

हिंदू धर्मातील अनिष्ट रुढी परंपरेमुळे स्त्रियांचे अन् त्यातही विधवांचे जीवन किती असहाय्य बनते हे दाखवून बाबांनी स्विकारलेला ख्रिस्ती धर्म किती श्रेष्ठ आहे हे सांगण्यासाठी थोडक्यात हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथांचे दर्शन घडविण्यासाठी व ख्रिस्तीधर्माचे महत्व पाठविण्यासाठी बाबांनी ही कादंबरी लिहली असली, ती प्रचारकी थाटाची असली तरी त्यातून तत्कालीन समाजाचे दर्शन घडते. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. समाजातील सुखदु:खाचे दर्शन घडविणे ही साहित्यिकांची जबाबदारी आहेच आहे... त्याला अनुसरून विचार केल्यास या कादंबरीचे मुल्य फार श्रेष्ठ दर्जाचे आहे यात शंका नाही. वर्णनाच्या ओघात हिंदू धर्मातील रितिरिवाज कसे अमानुष असतात त्याचेही विवरण केले आहे. नुसते रितीरिवाजच नव्हेत तर त्यांचा वापर करणारी माणसेही कशी अमानुष आणि पापप्रवृत्त बनतात हेही दाखविले आहे[५]. साहजिकच अशा रितीने जी कादंबरी अस्तित्वात आली तिच्यात ख्रिस्ती धर्मप्रचाराचा हेतू बलवत्तर दिसतो. ही ख्रिस्ती धर्मप्रचार करताना सगळ्याच प्रचारकाप्रमाणे बाबा पदमनजी अतिरेकाला जातात.

बाबा पदमनजींनी 'यमुनापर्यटनच्या' प्रत्येक प्रकरणात हिंदूच्या अमानुष रितीरिवाजांचा परामर्श घेतला आहे व विधवांना यासाठी भोगावी लागणारी दु:खे दाखविली आहे. 'गोदू' हीने तर पती निधनाची नुसती बातमी कानावर येताच 'केशवपन' या अनिष्ठरुढीच्या भितीनेच विहरित जीव दिला आहे. तर वेणू ही वैधव्याचे दु:ख मुकाटपणे भोगणारी दुर्दैवी विधवा आहे तिची साधी विचारपूस करायलाही कोणी नाही. आणि जेव्हा यमुना जिव्हाळ्याने तिला विचारते तेव्हा ती आपला पती आजारी असतानाची हकीकत यमुनेला सांगते.

''काय पुसता बाई, त्यांच्यापाशी घटकाभर बसेन किंवा बोलेन इतका मला वेळ कुठला? माझ्या पाठीशी जी मोट लाविली होती ती ओढता-ओढता मला पुरे-पुरे होत असे, मोठ्या पहाटेस

उठून गार पाण्याचे स्नान करून मला तुळशीस प्रदक्षिणा करावयास लावीत; ते एक तासभर झाले म्हणजे मी अगदी थकून जाई, मला घेरी येई पण काय करावे, प्रहर दिवस येण्याचे अगोदर मारुतीच्या देवळांतील पिंपळास प्रदक्षिणा करून यावे लागत असे तेथे उनामध्ये फिरून फिरून माझे डोके तापे. एकशे आठ फेरे झाले म्हणजे मग घरी आल्यावर मी हरकाचा भात करावा आणि तो गाईच्या शेणाने सारवलेल्या भुईवर काढून घेवून नुसता अळणी खावा. संध्याकाळी गोमूत्रामध्ये भाकर खावी असे सात दिवस मला करायास सांगितले. पण जेणेकरून त्यास काही गुण आला नाही. मग जोशास बोलावून त्याचे ग्रह पाहिले, त्याने मंगळाची दशा सांगितली व तिच्या शमनासाठी दाने करवली.[६]''

अशा प्रकारे पतीच्या शेवटच्या क्षणीसुद्धा या स्त्रियांना चार प्रेमाचे शब्दही बोलायास मिळत नसत. त्याचा सर्व वेळ उपास तापास करण्यातच जात असे. अशा या अनिष्ट रुढीपासून कादंबरीची नायिका 'यमुना' हीलासुद्धा खूप दु:ख भोगावे लागले. विनायकरावाने दुखण्यात बापाकडून त्याच्या निधनानंतर यमुनेचे वपन करु नये असे वचन घेतले होते. त्यामुळे काही दिवस यमुनेच्या घरातील मंडळीही शांत बसली व त्यातच आणखी घरचा उपाध्या मोरभट दोन महिने दुसऱ्या गावी गेला होता परंतू तो परत आल्यावर यमुनेचा विधी करण्याचा दिवस ठरला. यमुनेने केशवपनास विरोध करू नये म्हणून तिला गुरुचरित्राची पोथी ऐकविण्याचे ठरविले कारण तीत विधवांच्या आचाराविषयी सर्व सांगितले आहे. या बरोबरच बाबांनी पुरवणी अंकात जो 'हिंदू विधवांची दु:स्थिती' असे प्रकरण जोडले आहे ते वाचूनही आपणास समजते की हिंदूच्या रुढीमुळे विधवांना किती असह्य्य दु:ख भोगावे लागते. त्यामध्ये 'कायत' जातीतल एका विधवेने सांगितलेली हकिकत आहे.

पतीच्या निधनानंतर नालगापैकी कोणि तिला स्पर्श करीत नाही. तिच्या अंगावरील अलंकार उतरवण्यासाठी न्हाव्याच्या बायका असतात त्या तिच्या नाकाकानातील दागिने बुचाडून काढतात. अशावेळी नाकाकानाच्या कोमल अस्थि तुटतात. तसेच वेणीत गोवलेले दागिने काढताना केसाचे बुचडे उपटतात तर बांगड्या काढताना तिचा हात जमिनीवर ठेवून धोंड्याने ते दागिने तुटून दोन तुकडे होईपर्यंत ठेचतात अशा वेळी हातातला दुखापत होते. प्रेतदहनास जाताना विधवेला न्हाव्याच्या बायका चालवितात. प्रेतदहनाची जागा बहुधा नदीच्या किंवा तळ्याच्या काठी असते. तेथे विधवेला प्रथम पाण्यात ढकलून देतात व प्रेत जळून राख होईपर्यंत तिला पाण्यातच राहवे लागते. घरी आणतेवेळी तिला वाटभर ओढत फरफटत आणतात. विधवेने नवरा मेल्यापासून वर्षभर नित्य एकवेळ जेवावे शिवाय मधून-मधून पुष्कळ उपोषणे करावी. स्मशानातून घरी आल्यावर तिच्या अंगावर जी ओली



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वस्त्रे होती ती पंधरा दिवस ठेवायची व एखाद्या कानाकोपऱ्यात जमीनीवर बसायचे. तेराव्या दिवशी तिचे आप्त तिच्याभोवती जमून तिच्यापुढे रुपये ठेवितात व लाखो शिव्या देतात. सहा आठवडे लोटल्यावर तिला पहिल्या तेरा दिवसाची कपडे नेसावयास देतात नंतर अनुकूल असल्यास तिला गंगायात्रेस पाठवितात.

अशा प्रकारे हिंदूच्या अमानुष रुढी परंपरेमुळे हजारो विधवा पतीच्या मागून लवकरच मरतात. तर एखाद्या स्त्रिला तिचा नवरा बाहेरगावी गेला आहे हे जरी समजले तरी ती स्त्री आत्महत्या करते. मग तिचे पतीशी पटत असो अथवा नसो. हे असूनही सर्व लोक तिची तारीफ करतात परंतू तिने पतीप्रेमापोटी नव्हे तर वैधव्यात भोगाव्या लागणाऱ्या दु:खापासून मुक्ती मिळविण्यासाठी आपला प्राणत्याग केलेला असतो.

**'यमुना पर्यटन' कादंबरीचे स्वरूप -**

मराठीतल्या 'यमुना पर्यटन' या पहिल्या कादंबरीचे स्वरूप खात्रेनेच इतके महत्वपूर्ण आहे की, तिची साक्षेपाने चर्चा व्हावी तिच्या ख्रिस्ती वळणाच्या भाषेबद्दल व ख्रिस्ती धर्माच्या पुरस्काराबद्दल तत्कालीन वाचकांना उद्वेग वाटणे व त्यामुळे तिच्या लोकप्रियतेला बाध येणे स्वाभाविक होते व आजही इतक्या उघडपणे धार्मिक प्रचारासाठी त्या कादंबरीचा लेखकाने उपयोग केलेला पाहिला की रसभंग झाला असे वाटल्याखेरीज राहत नाही. परंतू सामाजिक परिस्थितीबद्दल कळकळ समाजातील एका विशिष्ट वर्गाच्या दु:खाबद्दल तीव्र जाणीव हा या कादंबरीचा प्राण आहे.[७] पद्मनजींनी जो सामाजिक प्रश्न कादंबरीत चर्चेसाठी घेतला तो त्या काळच्या केवळ ख्रिस्ती समाजालाच महत्वाचा वाटत होता असे नाही. १८५६ मध्ये ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या चळवळीमुळे विधवा विवाहापासून झालेली संतती कायदेशीर ठरली परंतु तत्पूर्वी १८३७ पासूनच महाराष्ट्रामध्ये विधवा विवाहाविषयी कोल्हटकरांची चळवळ सुरु होती. वामनराव कोन्हरकरांचे लेख प्रसिद्ध होत होते. बऱ्याच शास्त्री मंडळी नीदेखील या प्रश्नावर मोठ्या हिरीरीने उहापोह केला होता. बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रोत्साहनाने गंगाधरशास्त्री कटके यांनीही विधवा विवाहाच्या पुरस्कार करणारा एक ग्रंथ लिहला. विष्णूशास्त्री पंडित यांनी या प्रश्नापायी आपली वाणी लेखनी झिजवली. 'यमुनापर्यटनात' 'सभा' नावाचे एक प्रकरण आहे. त्यात कमिशरनच्या हेडक्लार्कच्या घरी पुत्रजन्मोत्सवाचे वेळी काही शास्त्री मंडळींचा विधवाविवाहाविषयी वाद झाल्याचे वर्णन आहे. या प्रकरणात त्कालीन वैचारिक परिस्थितीचे प्रतिबिंब

अचूकपणे पडले असावे. पुढे काही वर्षानंतर १८७० साली खुद्द शंकराचार्यासमोर अशी सभा झाली.

महाराष्ट्रातील विधवांच्या शोचनीय अवस्थेचे अत्यंत हृदयद्रावक वर्णन या कादंबरीत केले आहे. बाबा मूळचे हिंदूच पण त्यांनी ख्रिश्चन धर्माची दिक्षा घेतली होती. त्यामुळे आपल्या कादंबरीत त्यांनी ठिकठिकाणी येशू ख्रिस्ताची महात्मता वर्णन केली आहे. आणि कादंबरीच्या शेवटी नायिकेला ख्रिस्ती बनवून एका ख्रिस्ती गृहस्थाशी त्यांनी तिचा पुनर्विवाह लावून टाकलेला आहे.

यमुना पर्यटनाची नायिका यमुना ही मिशनऱ्यांच्या शाळेत शिकलेली मुलगी. तिचे लग्न सुस्थितीतील विनायकाशी झाले. यमुनेचे लग्न मोठ्या डामडौलाने झाले. तिचा बाप जरी गरीब होता तरी त्याने साडेपाचशे रुपये कर्जो काढले व बायकोचे काही दागिने होते ते मोडून इकडून-तिकडून सहाशेची भर करून आपल्या मातबर व्याह्याच्या तोलास तोल दिल्यासारखे लोकांत दाखविले. यमुना प्रथम काही दिवस बापाच्या घरी तर काही दिवस सासऱ्याच्या घरी राहत असे. जेव्हा यमुना व तिचा नवरा एकांती बोलण्याचे दिवस आले तेव्हा तिने त्याला आपल्या सुखदु:खाच्या सर्व गोष्टी सांगाव्या. विनायक दुसऱ्या तरुणासारखा आविचारी नव्हता. त्याने ते सर्व ऐकून घेऊन तिचे सांत्वन करावे व ज्या गोष्टीची तिला आवड होती ती तिला करण्यास मोकळीक द्यावी. त्यामुळे ती आपल्या खोलीत फावल्यावेळी पुस्तके वाचू लागली. तेणेंकरून तिच्या जीवास समाधान वाटे व बाहेरील कामकाजात कोणत्या प्रकारे वागावे याविषयी तिला बोध मिळे.

याप्रमाणे त्या तरुण स्त्रीपुरुषांचा परस्परावर फार प्रेम होते. विनायकापेक्षा यमुनेचे मन फार कोमल होते. तिला आपल्या मनाविरुद्ध काही गोष्ट करण्याचा प्रसंग मला म्हणजे तिच्या अंगास कंप सुटून घाम येई व या अडचणींतून कसे पार पडावे याविषयी मोठा विचार उत्पन्न होई; तिला असे वाटे की यावेळी मजवर आभाळ कोसळून पडले तरी पुरवले, पण माझ्या हातून असे कर्म न घडो अशा काळजीने तिचे शरीर कृश होत चालले हे पाहून तिचा नवरा एके दिवशी विचारतो , '' हे प्रिये तू दिवासानुदिवस अशी का होत चाललीस, तुला कशाची काळजी लागली आहे.''

यमुना हे प्राणपती, मी मनाच्या दु:खाने विव्हळ होते. माझ्या शरीराला काही व्याधी नाही, पण मनातील चिंतेने माझी ही अवस्था झाली आहे. बालविवाह, केशवपन, शिक्षणापासून स्त्रीला वंचित ठेवणे. स्त्रियांना स्वातंत्र्य नाकारणे सतीची चाल... अशा रुढीपरंपरेत स्त्री जखडली होती. या सर्व गोष्टींचा कळत-नकळत तिच्या मनावर परिणाम होत होता. तिच्या शेजारच्या एका विधवा



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

महिलेने केशवपनाच्या भितीने विहरित जीव दिला... हे पाहून ती उदास बनते. तिची उदासिनता घालविण्यासाठी विनायकराव तिला नागपूर, पंढरपूर, सातारा, जेजुरी असे पर्यटन घडवून आणतात पण या पर्यटन काळातही हिंदू स्त्रियांच्या करुण कहाण्याच तिला पहायला व ऐकायला मिळतात. 'यमुना पर्यटन' ही सर्व कादंबरी म्हणजे यमुना व विनायक यांनी केलेल्या प्रवासाची व त्या प्रवासात भेटलेल्याअनेक पीडीत, दु:खित विधवांच्या वेगवेगळ्या कहाण्यांची गुंफन आहे[८]. हिंदू धर्मात सुधारणा व्हावी आणि विधवा विवाह रुढ व्हावेत यात बाबांना फारसा रस नाही. विधवांना श्रद्धा ठेवण्यासाठी 'तारण' येशू ख्रिस्त उपलब्ध असावा यात त्यांना रस आहे. यामुळेच विधवांचा प्रश्न हा ''यमुना पर्यटन'' या निमित्तमात्र प्रश्न आहे. विधवांच्या प्रश्नाच्या निमित्ताने ख्रिस्ती धर्मप्रचार हे या हेतूचे खरे रुप आहे.

या कादंबरीत यमुनेचा प्रवास दुहेरी आहे. एकतर ती त्र्यंबकाहून नागपूर तेथून पंढरपूर मग सातारा आणि पुन्हा त्र्यंबक असा भौगोलिक प्रवास करते आणि दुसरा म्हणजे हिंदू धर्मातून ख्रिस्ती धर्मापर्यंत यमुनेचा प्रवास होतो. या यमुनेच्या पर्यटनात हिंदू धर्मावर श्रद्धा असणारी यमुना, अनुभवाने अश्रद्ध होत ख्रिस्ती होत जाते. अशी कहाणी नाहीतर यमुना ही आरंभापासून मनाने ख्रिस्ती झालेली आहे. भेटलेल्या प्रत्येक विधवेला यमुनेने ख्रिस्ती धर्माचा उपदेश करावयाचा असेल तर पर्यटनाच्या पूर्वीच यमुना मनाने ख्रिस्ती होणे अपरिहार्य होते. त्यासाठी ती शिकलेली असणे भाग होते त्याची तजवीज बाबांनी केलेली आहे.

प्रस्तुत कादंबरीत प्रथम आपल्याला भेटते ती गोंदू, शिवरामची बायको तिच्या पतीच्या निधनामुळे निर्माण झालेल्या प्रसंगातून गोंदूची दयनीय परिस्थिती व त्यातून तिने केलेली आत्महत्या ह्या गोष्टी तर वाचकांना अंतर्मुख करतातच पण त्यापेक्षाही त्याप्रसंगी भोवतालच्या आप्त स्वकीयांची जी प्रतिक्रिया होते ती फारच भयंकर आहे. केशवपन विटंबना, अवहेलना ह्या सगळ्याच दु:खाच्या मालिकेचा स्वीकार करण्यापेक्षा स्त्री आडविहीर जवळ करीत होती. ह्याचे बोलके चित्र गोदावरीच्या रुपाने उभे केले आहे.

त्यानंतर भेटते तो वेणू, घरातील सगळी माणसे बाहेर गेल्यावर संधी साधून आपली नायिका यमुना वेणूशी बोलते कुणाचे आपुलकीने बोलणे कधीच अपेक्षीत नसल्याने यमुनेच्या आपलेपणावर तिचा विश्वास बसत नाही परंतु यमुना खऱ्या आपुलकीने बोलते आहे असा दिलासा मिळाल्यानंतर

वेणू आपल्या पतीचे दुखणे, दुखण्यातही कामाच्या रागरगाड्यात पतीजवळ चार गोष्टी बोलायला मिळाल्या नाहीत याचे दु:ख, पतीच्या रोगाची परिक्षाच न झाल्याने त्याच्या दुखण्याचे मृत्यूत झालेले पर्यवसन आणि यानंतर विधवा म्हणून तिला भोगावी लागणारी दु:खे या सर्व गोष्टी ती मोकळेपणाने यमुनेशी बोलते. वेणूचे माहेर फार दूर खानदेशात होते. आई मरून गेलेली आणि बापाला सरकारातून गावोगाव फिरण्याची चाकरी होती. वेणू सहा वर्षाची असता तिचे लग्न झाले. तेव्हाच तिची आई वारली होती म्हणून फार करून वेणू सासरीच असायची. नवरा आजारी पडल्यावर त्याच्याजवळ घटकाभर बसण्यासाठी तिला वेळ मिळत नसे. मोठ्या पहाटेस उठून गार पाण्याचे स्नान करून तिला तुळशीस प्रदक्षिणा करावयास लावीत. प्रहर दिवस येण्याचे अगोदर मारुतीच्या देवळातील पिंपळास प्रदक्षिणा करून यावे लागत असे. तेथे उन्हामध्ये फिरून तिचे डोके तापे. एकशे आठ फेरे झाले म्हणजे मग घरी आल्यावर तिने हरकाचा भात गाईच्या शेणाने सारवलेल्या जमीनीवर घेऊन नुसता अळणी खावा. संध्याकाळी गोमुत्रामध्ये भाकर खावी असे पुष्कळ उपाय केले तरी काही झाले नाही. आणि पती निधनानंतर तर तिची खूपच दैयनिय अवस्था झाली. वाघाच्यारानात सोडून दिलेल्या गाईसारखे तिला झाले. चहूकडून तिला तोडतोडून खातात. सर्वांची तिच्यावर सत्ता. जशी एक कुळंबीण आहे तशी दुसरी आणि घरातील सर्व काम करूनही तिला एखादा गोड घास मिळत नसे. सणावारी एखादा गोड घास तिच्या तोंडी पडतो, तोही अगोदर फार दिवस घरात राहून शिळा झाला व त्यास वास येऊ लागला म्हणजे तिला खायास देतात आणि ते नाही खाल्ले तर गाढवीला खाऊन-खाऊन माज आला; म्हणून उकिरड्यावर टाकून देते असे म्हणतात. तसेच वेणूला वस्त्रांची तर फार अपदा भोगावी लागते. तिचे अंथरुन पाहिले तर एक कांबळी व एक चिंध्या झालेली पासोडी आहे. आणि दोन-चार जुनी धोतरे व एक धावळी. एवढी काय ती तिची सगळी जिनगी. आणि एवढे हाल असूनही धड तिला कोणी फुकाचा गोड शब्ददेखील बोलत नाही. दिवसा कामकाजात कसाही वेळ जातो. रात्र झाली म्हणजे थकली, दमलेली प्रेत होऊन पडते तरी लवकर झोप येत नाही. कधी-कधी मनात विचार येतो आता वाचून तरी काय उपयोग कोटे तरी तळे, विहिर पाहावी म्हणजे मोकळी होईन पण या जिवाची आशा सुटत नाही. अशा वेणूची यमुनेला खूप दया येते. व तिच्या जीवाला धीर येण्यासाठी यमुना तिला येशू ख्रिस्ताची गोष्ट सांगते. ह्या घटनेत विधवांच्या दु:खाची कहाणी तर आहेच त्याचबरोबर त्यावेळच्या समाजाच्या अंधश्रद्धाळू विचारसणीचीही साक्ष पटते.

पुढे यमुना व विनायक नागपूरला जातात तिथे विनायकाचा मित्र दौलतराव याची मामे

बहिण विधवा असते. ब्राह्मणाप्रमाणेच उच्च मराठ्यानीही पुनर्विवाह त्याज्य ठरविल्याने तिला मोकळीक नव्हती. तिला देवाधर्माचा नाद लावावा म्हणजे तिचे मन उदास होणार नाही. ह्या कुणीतरी दिलेल्या सल्ल्यावरून तिच्या विनोदनासाठी येणाऱ्या पुराणिक बुवाने प्रथम 'गोपी आख्यान लावले व त्यातील दशमस्कंधाला आरंभ केला.'' त्यातील गोपीकृष्णाच्या क्रीडेच्या कथा ऐकून तिला वैराग्य येण्याऐवजी भलते-भलते विचार तिच्या मनात येऊ लागले. त्यामुळे हजार दीड हजाराचा ऐवज घेऊन ती विधवा त्या पुराणिकाबरोबर पळून गेली.

पुढे पंढरपूरहून साताऱ्याला येताना वाटेत भेटलेली कुळंबीण किंवा भिक्षेकरी विधवा यांच्या गोष्टी येतात. पंढरपूर येथे यमुना व विनायक ज्या घरात बिऱ्हाडाने राहिली होती त्या घराची मालकीण केशवपन केलेली एक विधवा होती. पण अपरात्री डोक्यावर केसांचा टोप घालून व सर्व सौभाग्यचिन्हे धारण करून ही बाई व्याभिचारासाठी घराबाहेर जाऊन पहाटे परत येई. कुणी विचारले तर सांगे, ''माझ्या घरी विठ्ठलाची रखमाई दिवसा गुप्तपणाने राहते. ती रात्री विठ्ठलाकडे जाते.'' अशी आपल्यादेवाचीही नाचक्की करण्यात ती कमी करत नसे. विनायकरावांनी तिला जेव्हा तिची हकीकत विचारली तेव्हा समजले की ही बालविधवा पतीनिधनानंतर केशवपनाच्या भितीने कुळंबीणीची भूलथाप ऐकून घरातून पळून येते. कुळंबीण तिला कुटंणखाण्यात आणते. त्यातच तिचे एका गिऱ्हाईकांशी दोस्ती जमून दोघे कुंटणखाण्यातून पळून जाऊन काशिला राहतात. दोघांनी लग्न मात्र केले नव्हते..... तेथे त्यांना आपत्यप्राप्ती होते. त्यानंतर काही दिवसांनी तिच्या नवऱ्याचा मृत्यू होतो. हिंदू धर्मातील प्रथेनुसार ती केशवपन करते अन् पुण्यास येऊन एका पुराणिकाजवळ राहते. तिथेही तिला वाईट अनुभव आल्याने पुणे सोडून ती पंढरपुरला येऊन एका बडव्याकडे रखेल म्हणून राहते पण बडव्याकडूनही तिला त्रास होऊ लागला... तो चुकविण्यासाठी ती पुन्हा वाममार्गाला लागते.

भिक्षेकरी विधवा म्हणजे भरीणबाई हीसुद्धा श्रीमंत घराण्यातील होती पण तिच्या पतीच्या निधनानंतर तिच्या दिरेने तिला फसवून सारी संपत्ती एकट्याने घेतली व तिला दारोदार अन्न-अन्न करायला लाविले. तिचा नवरा मरायास टेकला तेव्हा त्याने भरीणबाईच्या नावावर घर व शेताचे पाच खंड्या भात इतके करून कागद लिहिला होता. ती त्याच्या मरणानंतर दिराने तिच्यापासून हिंसकावून घेतला. मग ती सरकारात फिर्यादिस गेली. तेथे तिच्या वाटेचे कोणी उभे राहीना. तिथले सर्व शिपाई कारकून, वकीला अगोदर तिच्यापाशी पैसे मागू लागले. तिला कोणीच आत जाऊ देईना. ती त्याच्या

हातापाया पडली आणि म्हणू लागली की माझी दाद लागू द्या. मग मी तुम्हास काही तरी देईन. तशातही तिच्याजवळ दीड तोळ्याचे जोडवे होते, ते मोडून त्यातून आठ-दहा रुपये चिटणीस वकारकून यास दिले. तरी तिचे काम झाले नाही. दररोज कचेरीत येरझारा घातल्या. मुनशीच्या घरी जाऊन बसावे पण कोणी तिचे मनावर घेईना तिच्या दिरांनी पुष्कळ लाच देऊन तेथल्या कामदारांचे हात बांधून घेतले होते. म्हणून त्यांनी तिची अर्जी मध्येच दाबून टाकली. मग तिला तिच्या दिरांनी घरातून हाकलून दिले. म्हणून आता दारोदार भिक मागून पोट भरते. यानंतर अल्पवयीन विधवांच्या स्थितीचा गैरफायदा घेऊन त्यांना कुमार्गास लावणाऱ्या अनेक विधवांच्या कथा यमुनेला कळतात.

साताऱ्याला जगन्नाथ सोनाराकडे यमुना विनायक उतरतात. यजमानांच्या पुत्रजन्मोत्सवाच्या निमित्ताने बरीच मंडळी जमणार असतात. त्यांच्यासमोर पुनर्विवाहाच्या इष्टनिष्टतेवर वाद होतो व त्यात पुनर्विवाह पक्षाची सरसी होते. ह्या चर्चेच्या निमित्ताने अनेक विधवांच्या दु:स्थितीग्रस्त घटना वाचकांच्या समोर येतात व बालविधवा, कुमारीमाता, व्यभिचार, अघोरी उपाय अशा अनेक प्रश्नांची चर्चा वादाच्या निमित्ताने होते. संबंध कादंबरीत चालणाऱ्याह्या पतीपत्नीच्या संवादात शेवटचा हा चर्चेचा विषयही येतो. व त्यावर यमुना चाणाक्षपणे एवढाच प्रश्न विचारते की, ''तुमची ही चर्चा इसापनितीतील उंदराच्या सभेप्रमाणे झाली. मांजराच्या गळ्यात घंटा बांधावी अशी युक्ती ज्या उंदराने काढली तो शहाणा होता खरा पण तो काम करावयास कोणीही पुढे झाले नाही. त्याप्रमाणे ह्या लोकांनी पुनर्विवाह करावा असे ठरविले पण पुढे होऊन सर्वांना उदाहरण दाखविण्यासाठी कोणी सिद्ध झाला नाही तर असे निर्णय शेकडो वेळा केले तरी काय उपयोग? ह्या यमुनेच्या प्रश्नाला विनायकाजवळ उत्तर नाही. त्यामुळे एवढी चर्चा शास्त्राधार काढूनही तिचे बोलणे विनायकाला मुकाट्याने ऐकून घ्यावे लागले.

दुसरे दिवशी यजमानांचा निरोप घेऊन यमुना व विनायकराव परतीच्या प्रवासास लागले. जेजुरीजवळ छत्रीमुळे बैल बिचकून उधळले आणि बैलगाडीला अपघात झाला. त्यात विनायकास दुखापत झाली व त्यातच त्यांचा अंत झाला. मरतेसमयी आपल्या पत्नीची विटंबना होऊ नये याबद्दलची चिंता विनायकरावांनी यमुनेकडून बाप्तीस्मा घेतला व ख्रिस्ती धर्माचा स्विकार केला. विनायकरावाने आपल्या दुखण्यात बापाकडून असे वचन घेतले होती की माझ्या मागून इथे बपन करु नये. त्यावरून यमुनाबाईस तिच्या नवऱ्याचे प्रेत उचलतावेळी कोणी काही बोलले नाही; परंतु एक-दोन महिन्यांनी तिची सासू तिला फारच जाच करु लागली तिणे तिजवर जड कामे टाकावी ती तीणे करावयास मागे



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

हटू नये, तरी तिला उठता-बसता अल्पस्वल्प कारणावरून शिव्या बसू लागल्या. तिचा सर्वांनी तिरस्कार करावा, तिच्या हातचे पाणी कोणी घेत नसत, मग अन्न कोण खातो? हे सर्व तिणे आश्चर्यकारक रितीने सहन करावे परंतु पुढे असे झाले की घरचा उपाध्या दोन महिने गावी गेला होता, तो परत आल्यावर विनायकरावाच्या घरी येऊन यजमानीनबाईस यमुनेचे केशवपन करावे हे फुलवून सांगितले व केशवपन करण्याचा दिवसही ठरविला. मोरभटजी यमुनाबाईस गंगेवर नेण्याकरिता आले. सासूबाईंनी तिला पुष्कळ आग्रह केला, पण ती खोलीबाहेर पडेना मग ती तिला शिव्या देऊ लागली. तरी काही उपाय चालेना असे पाहून तिणे मोरभटास परत जाण्यास सांगून ती ज्या खोलीत होती तीत तिला कोंडले. आणि सगळा दिवस अन्नपाणी दिले नाही. घरात शिवराम व त्याची आई होती. ती बिचारी फार श्रमी होऊन रडू लागली. मग रात्र पडल्यावर यमुनाबाईच्या सासूने तिला खोलीतून बाहेर काढले आणि केरसुणीने पुष्कळ मारुन तिचे केस धरुन तिला ओढीत-ताणित परसातील गोठ्यापर्यंत नेले. काळोख पडला तरी यांच्या पोटात अन्न नाही. भुकेने व्याकूळ होऊन ती तळमळू लागली. हे सर्व पाहून शिवराम म्हणतो, ''आई ताईने आता इथे कशास राहवे की?'' मग यमुनाबाई, शिवराम व शिवरामची आई ही तिघे विनायकाच्या ख्रिस्ती मित्राकडे जाते व ख्रिस्ती धर्म स्विकारते. एका शिलवान गृहस्थाशी ती पुनर्विवाह करते.

बाबा पदमंजीची ही कथा लक्षात होता असे ध्यानात येते की यमुनेच्या हिंदू धर्माकडून ख्रिस्ती धर्माकडे होणाऱ्या मानसिक प्रवासाची कथा त्यांना मुख्यत: सांगावयाची आहे[९]. भौगोलिक पर्यटनाचा केवळ साधन म्हणून उपयोग केलेला आहे. कारण या भौगोलिक पर्यटनामुळेच केवळ यमुनेच्या डोळ्यापुढे अनेक दृश्ये बाबांना उभी करता आली. विधवांचा प्रश्न व धर्मांतरांचा प्रश्न ह्यांची सांगड बाबांनी ह्या कादंबरीत घातली आहे. त्यामुळेच ह्या पुस्तकाला एक प्रकारे ख्रिस्ती प्रचाराचे स्वरुप आले. अर्थात हा प्रचारकी भाग वगळून यमुनापर्यटनचे एक विशेष वैशिष्ट्य डोळ्यात भरते ते म्हणजे वास्तवता.

यमुना पर्यटनची रचना कादंबरी आणि लघुकथा यांच्या सीमेवरील रचना आहे[१०]. बाबांना नुसती एका व्यक्तीची कहाणी सांगायची नव्हती. त्यांना सगळ्या समाजाचेच चित्र रेखाटण्याचे होते. विधवांच्या विविध जीवनाच्या हकीकती त्यांना एकत्र आणावयाच्या होत्या. त्या एकत्रित माणण्यासाठी यमुनेला फिरवणे भाग होते. पश्चिम महाराष्ट्र असो वा नागपूर असो की विजापूर, धारवाडसारखा सीमेवरचा प्रदेश असो की मुंबईसारखे शहर असो पंढरपूरसारखे धर्मक्षेत्र असो किंवा दुसरा कोणताही

साधागाव असो सर्वत्र फिरविणे भाग होते. विधवा यमुना अशी फिरू शकली नसती. इतरांच्या कहाण्या ऐकून यमुनेला फिरण्याला वैधव्य फारसे उपयुक्त नव्हते कारण विधवा यमुना एक तर घरात अडकली असती किंवा चर्चमध्ये जाऊन पोचली असती. कामाच्या निमित्ताने, हवा पालटाच्या निमित्ताने यमुनेला महाराष्ट्रभर फिरविणे सोपे होते. सगळ्याच बाबी कहाणी रुपाने एकत्र आणणे बाबांना शक्य नव्हते म्हणून विधवांच्या काही हकीकती मित्रांच्या पत्रातून कळतात, उरलेल्या हकीकता पर्यटनात भेटणारी पात्रे सांगतात. याहकीकतीपैकी पहिली हकीकत विधवा गोदावरीची आहे. ही यमुनेची समवयस्क मैत्रिण हिने वैधव्यात जगणे टाळण्यासाठी सरळ आत्महत्येचा मार्ग स्विकारलेला आहे. दुसरी हकीकत यापेक्षा वेगळी आहे. दुसरी विधवा वेणू हिने संसारसुख काही वर्षे भोगलेले आहे. त्या सुखाच्या स्मृती आठवल्या म्हणजे अजूनही तिचे डोळे पाणावतात. सहा वर्षे वैधव्याच्या यातना वेणू भोगीत आहे. हिंदू विधवेचा वेणू हा खरे म्हणजे प्रतिनिधीत नमुना. आपले चरित्र संभाळून अनंत कष्ट ती उपशीत आहे. पण अजून तिला मरावेसे वाटत नाही. या वेणूला कोणताही रस्ता दाखविणे बाबांच्या आटोक्यात नव्हते. कारण तिने धर्म सोडला नसता. नव्या विवाहाची तिची मागणी नाही. तिला फक्त कमी कष्टमय जीवन, पोटभर अन्न व अंगभर वस्त्र हवे आहे.

पण यापेक्षा अधिक चित्तथरारक कहाणी शिवरायच्या आईची आहे, म्हणजे पंढरपूरच्या विधवेची आहे ही कहानी बाबांनी कोढल्या तरी वास्तविक हकीकतीवरून उचलली असावी असा अंदाज आहे. कारण या कहाणीत बाबांना न पेलणाऱ्या वास्तवाचे अधिराज्य आहे. बाबांना जर कलात्मक दृष्टी असती तर हीच कहाणी उलगडून पाहण्याची इच्छा त्यांना झाली असती. या पंढरपूरच्या कहाणीत खोटेपणाचे काही स्वप्नाळू रंग, काही भडक अतिरेकी छटा बाबांनी फेकल्या आहेत पण त्या सरळ बाजूला काढता येतात. ही पंढरपूरची विधवा मुळची राहणारी साताऱ्याची थोर कुळातील सौदर्यसंपन्न मुलगी. हिच्यासाठी बापाने नऊ हजार रुपये हुंडा खर्चिला आहे. वर शोधण्यासाठी देशोदेशी लोक पाठविले व ग्वाल्हेरचा मुलगा निवडला. लग्नानंतर ग्वाल्हेरला पोचेपर्यंत ही मुलगी विधवा झाली. हा सगळा भाग आपण कृत्रिम म्हणून बाजूला सारू शकतो.

पण या अल्पवयीन विधवेने सासरी कोणतेही हाल न होता तीन वर्षे काढलेली आहेत. हालामुळे नव्हे तर हाल होतील ही भिती मनात भरविल्यामुळे ही घरातून पळून जाण्यास तयार झाली. घरातून पळाल्यानंतर ती एका कुंटणखाण्यात राहिली. तिच्या म्हणण्याप्रमाणे तेथील मंडळी फारच ममताळू होती. त्यांनी तिला गाणे, नाचणे शिकविणे. 'ममताळू कुंटणखाणा ही कल्पना बाबांच्या

ख्रिस्ती मनाने सहजासहजी स्विकारली नसती. तेथे काही दिवस तिने नायकिणीचा धंदा व्यवस्थित रीतीने केला. या धंद्याची आपणास शिसारी आली असे ती म्हणत नाही. पण पुढे नित्य गाणे बजावणे याचा कंटाळा आला. नव्या-नव्या गिऱ्हाईकांशी दोस्ती जमविणे याचा त्रास होऊ लागला. आणि पैशाची प्राप्ती फारशी होईना म्हणून तिने कुंटणखाना सोडला. नायकिणीच्या व्यवसायातील एकीची ही तटस्थ जबानी आश्चर्यकारक आहे. एका तरुणाबरोबर पळून ती काशिस गेली; व तशीच बिनलग्नाची त्याच्याजवळ राहिली. या माणसाजवळ तिने निष्ठेने संसार केलेला दिसतो. बिनलग्नाची राहताना ही आपले नायकिणपण विसरून तिथे संसारी झाली आहे. याच ठिकाणी तिला शिवराम हा मुलगा झाला. शिवरामच्या बापाची उत्तरक्रिया पार पडावी म्हणून तिने तारुण्यात केशवपन पत्करले. एके काळची ही नायकीण ती जबाबदारी टाळू शकली असती. पण पत्नी म्हणून येणारी जबाबदारी तिने पत्करली. येथून ती पुण्यास आली व अजून एका पुराणिकाजवळ राहिली. तेथून फजिती होऊ नये म्हणून पळाली व पंढरपुरास आली. तेथे एका बडव्याने तिला ठेवले आहे. जो शिवरामची मुंज करील. त्याचे लग्न करील त्याच्याजवळ बिनलग्नाची ठेवलेली बाई म्हणून राहण्यास आपण तयार आहो असे तिचे म्हणणे आहे. पुत्राला प्रतिष्ठित करण्यासाठी ती आता कायम अप्रतिष्ठित राहण्याच्या तयारीत आलेली स्त्री आहे. तिच्या मनाची जडणघडण अनीतीत सतत वावरून असतानासुद्धा तिच्या मनाच्या उरलेला मोकळेपणा ही फारच विलक्षण बाब आहे.

या तीन विस्तृत कहाण्या म्हणजेच स्वतंत्र कथाच आहेत. या तीन कथा यमुनेच्या कथेत येऊन बसलेल्या आहेत. अशा रीतीने 'यमुना पर्यटन' या कादंबरीने आकार धारण केलेला आहे. तीन विधवांच्या तीन भिन्न कहाण्या त्यातील दोन पात्रांनी स्वत:च भेटून सांगितलेल्या एक शेजारी पाहिलेली, एक विजापूरच्या विधवेने ओझरती सांगितलेली व अनेक विधवांच्या छोट्या-छोट्या कथा ही रचना पाहिली म्हणजे एका सूत्रात गुंफलेले कथागुच्छ व आरंभीची कादंबरी यांचे रुपसाम्य दिसू लागते. या विधवा विविध जातीतील आहेत. ब्राह्मण, मराठा, शेणवी, कायस्थ या त्यांच्या प्रमुख जाती. त्यांच्यातील काही नातेवाईकांकडे बिनलग्नाच्या राहतात. काही पुन्हा केस वाढवून वेश्याव्यवसाय उघडपणे करतात. काही चोरट्या संबंधातून भ्रूणहत्येपर्यंत जातात. काही आत्महत्या करतात. असे हे विविध प्रकारचे चित्र बाबांनी उभे केले आहे. या चित्राची कलात्मकता उणी असली तरी कथा व व्याप हरिभाऊंच्यापेक्षा मोठा आहे.



14456
A

'यमुनापर्यटन' या कथेला मराठीतील पहिले स्वतंत्र कादंबरीचे स्थान बऱ्याच टीकाकारांच्या मते दिले जाते. मात्र काही टीकाकारांनी मतभेद व्यक्त केले आहेत. ''कादंबरीचे व्यवच्छेदक विशेष असे घटक यमुनापर्यटनात सापडत नाहीत. कादंबरीचा आकारही साधारण मोठ्या गोष्टीएवढा आहे. म्हणून या कृतीस रामोजी गणोजी सांप्रदायातच घालणे अधिक योग्य आहे.'' असे बापट गोडबोले यांचे मत आहे. तर न्या.रानडे यांनी जो मराठी वाङ:मयाचा आढावा काढला त्यात 'यमुना पर्यटनचा' प्रसंशापूर्वक उल्लेख आहे परंतु वि.का.राजवाडे यांच्या कादंबरीवरील लेखात किंवा श्री.कृ.कोल्हटकर यांच्याही 'मराठी कथा वाङ्मय' या लेखात या कादंबरीचा उल्लेखही नाही. कोल्हटकरांनी पहिल्या स्वतंत्र कादंबरीचा मान मुक्तामालेला दिला आहे. 'यमुनापर्यटन' ही कादंबरी त्यांच्यासमोर असावी किंवा ती कादंबरी या सज्ञेला पात्र आहे किंवा नाही याचा विचार करून त्यांनी 'मुक्तामालेला' हे स्थान दिले असावे असे वाटत नाही. सरवटे यांनी मात्र निश्चितपणे हे स्थान 'यमुनापर्यटनला दिले आहे व कादंबरीतला सामाजिक दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व रास्त असण्याबद्दल ग्वाही दिली आहे. पोतदारांना या कादंबरीतील विधवांची करुन कहाणी व बऱ्याच विधवांच्या अपरिहार्यपणे होणाऱ्या अध:पतनाचे वर्णन दोन्हीही अतिशोक्तीपूर्ण वाटतात परंतु सरवटे यांना हे मान्य नाही; व खरोखरी 'यमुनापर्यटना'च्या नंतर ३०-३५ वर्षांनी प्रसिद्ध झालेल्या हरी नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांनी ती वर्णने अतिशोक्तीपूर्ण नसल्याचे सिद्धच केले.

वि.ह.कुलकर्णी यांनी यमुना पर्यटनला स्वतंत्र कादंबरी हा मानाचे स्थान नि:संदिग्धपणे दिले आहे[११]. ''परंतु ही मराठीतील पहिली कादंबरी अशी निपजल्यामुळे तिला लोकप्रियता लाभली नाही व लगेच पुढल्या वर्षी सत्तावन्न सालच्या बंडाच्या धामधुर्मामुळे लोकांचे लक्षही काही कालपर्यंत तरी वाङमयावरून उडून राजकीय घडामोडीवर खिळल्यामुळे ह्या कादंबरीची पुढे आठवणही बुजून गेली.'' हे त्यांचे मत कितपत योग्य आहे याविषयी शंका वाटते. १८५७ सालच्या बंडाचा पुढाकार महाराष्ट्रीय व्यक्तीकडे असला तरी त्याचा प्रयत्न परिणाम महाराष्ट्राच्या जीवनावर सर्व साधारणपणे महाराष्ट्र समाजावर फारसा झाला नाही पण ही कादंबरी काही काळ लुप्तप्राय झाली हे स्पष्टच आहे.

'यमुना पर्यटन' या बाबा पदमनजींच्या कादंबरीने पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून मोलाची कामगिरी केलेली आहे परंतू या कादंबरीला काही नर्यादाही पडलेल्या आहेत. 'यमुना पर्यटन' चे लेखक बाबा पदमजी यांनी कादंबरीतंत्राचा फार व्यवस्थित विचार केला असेल. हातीमताईत त्यांनी आपल्या कादंबरीची बीजे शोधली असतील असे सुचविण्याचा उद्देश नाही तर 'यमुनापर्यटनची'

रचना कथा आणि कादंबरी यांच्या सीमेवरची रचना आहे. इकडे बोट दाखविणे हा इथे उद्देश आहे. बाबा पदमनजींची ही कादंबरी आर्थिक दृष्ट्या फारच यशस्वी म्हणावी लागेल. कारण त्या काळात हिच्या लेखनाबद्दल बाबांना २०० रुपये मिळाले. पण हा मोबदला कादंबरीच्या कलागुणाचा नव्हता किंवा तिच्या शक्य खपाच्या आधारे योग्य मानधनाचाही नव्हता. या मोबदल्याचे स्वरुप 'न्यू चर्च'च्या ख्रिस्ती धर्मप्रचाराच्या कार्यातील एक साधन ताब्यात घेणे इतकेच दिसते. या कादंबरीला वाचकवर्गात फारसी लोकप्रियता मिळालेली दिसत नाही [१२]. इ.स. १८८२ व १८९० साली या कादंबरीच्या अजून दोन आवृत्या निघाल्या पण न्या.रानडे, इतिहासाचार्य राजवाडे, श्रीपादकृष्ण कोल्हटकर इ. मंडळींना ही कादंबरी ज्ञात असल्याचे दिसत नाही. याच कालखंडातील रे.टिळकांना मात्र ही कादंबरी ज्ञात आहे. मराठी ख्रिस्ती वाडमयाचे जनक म्हणून बाबा पदमनजींचा उल्लेख करताना हिचाही उल्लेख आला आहे. यावरुन अंदाज काढावयाचा तर मराठी अधिक ख्रिस्ती समाजाबाहेर मात्र प्रचाराचे एक साधन म्हणून हिचा वापर होत होता असा निष्कर्ष काढता येईल.

'यमुनापर्यटन' मध्ये घडण्याची शक्यता फारशी नव्हती. जीवन दर्शनाचे अगर व्यक्तिदर्शनाचे सामर्थ्य बाबांच्याजवळ फारसे नव्हते. त्यांची शैली निवेदनाची पातळी ओलांडून प्रत्ययकारी अभिव्यक्तिच्या पातळीपर्यंत कधी पोहचू शकत नाही. या कादंबरीतील कथानक विस्कळीत आहे, प्रसंग एकान्तिक आहेत, स्वभाव रेखाटन हिच्यात फारसे नाहीच हे नोंदवून नंतर बाबांच्या भाषा पद्धतीची स्तुती करण्यात फारसा अर्थ नाही. महामहोपाध्याय पोतदारांनी बाबांची भाषापद्धती फार गोड असून तिच्यात कळकळ व तळमळ भरपूर आहे असे मत दिले आहे. या मताची सत्यता तारतम्यानेच घेतली पाहिजे. मराठी कादंबरीतील बोधवादाचा व मराठी कादंबरीचा आरंभ म्हणून 'यमुना पर्यटन' ला महत्व आहे. आशयाचा वास्तववाद असुनसुद्धा कादंबरीत जिवंतपणा येण्यास अतिरेकी बोधवादाच्यामर्यादा कशा पडतात. हे ही कादंबरी अगदी प्रारंभीच स्पष्ट करते. जी मराठी भाषा बाबा लिहित होते ती मिशनऱ्यांची तत्कालीन अभ्यासक्रमातील क्रमिक मराठी आहे. तिच्यात फारशी अलंकारिता नव्हतीच. या कक्षेबाहेर जाऊन वर्णन करण्याचा प्रयत्न झाला की बाबांची भाषा परंपरागत संकेत व अलंकार सुरु लागते. म्हणजे साधेपणा हे स्वरूप या शैलीचा अंगभूत भाग नाही. या स्वरुपाचे कारण मिशनऱ्यांची मराठीची मर्यादा आहे.

---

## संदर्भ टीपा


१. बाबा पदमनजी (यमुनापर्यटन) मनोगत - स्नेहल तावरे. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौथी - १९३७.

२. रा. श्री. जोग (प्रदक्षिणा) कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रमांक - १४४.

३. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) पृष्ठ क्रमांक - १४, देशमुख आणि कंपनी, पुणे, पहिली आवृत्ती २७ एप्रिल १९७१.

४. रा. श्री. जोग (प्रदक्षिणा) कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे - पृष्ठ क्रमाकं - १४४.

५. रा. श्री. जोग (प्रदक्षिणा) कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे - पृष्ठ - १४४.

६. बाबा पदमनजी (यमुना पर्यटन) स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, आवृत्ती - चौथी, १९३७ पृष्ठ क्रमाकं - ३७.

७. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरीचे पहिले शतक) पृष्ठ क्रमांक - १९. मराठी साहित्य संघ, मुंबई. प्रथमावृत्ती २० जुलै १९५३.

८. डॉ. ग. ना. जोगळेकर (मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास काही लेखक काही साहित्यकृती इ.स. १९०० ते १९२०) स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती - डिसेंबर १९९१, पृष्ठ क्रमांक ७०.

९. डॉ. ग. ना. जोगळेकर (मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास (काही लेखक काही साहित्यकृती इ.स. १८०० ते १९२०) स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर १९९१, पृष्ठ क्रमांक - ७२)

१०. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) पृष्ठ क्रमांक - ११, देशमुख आणि कंपनी, पुणे. पहिली आवृत्ती २७ एप्रिल १९७१.

११. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरीचे पहिले शतक) पृष्ठ क्रमांक - १९. मराठी साहित्य संघ, मुंबई. प्रथमावृत्ती २० जुलै १९५३.

१२. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) देशमुख आणि कंपनी, पुणे. पहिली आवृत्ती २७ एप्रिल १९७१. पृष्ठ - ८.




SHIVAJI UNIVERSITY LIBRARY